भारतीय जनता पक्ष
केंद्रीय कार्यालय
११, अशोक रोड, नवी दिल्ली -०११
फोन - ०११-२३००५७००, फेक्स- ०११-२३००५७८७

भाजपचे राष्ट्रीय प्रवक्ते आणि खासदार श्री प्रकाश जावडेकर यांचे प्रेस वक्तव्य

ईपीएस-९५( ईपीएस-पेन्शन) योजनेखाली रु. १००० नाही तर कमीतकमी ३००० रु. पेन्शन जाहीर केले पहिजे अशी मागणी भारतीय जनता पक्षाने केली आहे. सरकारने देशातील कामगार वर्गासाठी कमीतकमी पेन्शन म्हणून १००० रु. देण्याचा प्रस्ताव जाहीर करण्यासंदर्भातील एका अहवालाबद्दल विचार करीत असल्याने भाजपने अशी मागणी केली आहे. या योजनेबाबत भाजप ने अशी टीका केली आहे कि हे पेन्शन फारच कमी आहे. भाजप सतत या योजनेबाबत आग्रह करीत होता, ज्यात दर महिन्याला ४१ लाख पेन्शनर आणि ५ करोड कामगारांचे पेन्शन वाढविण्याचे अभियान चालविण्यात आले.

श्री प्रकाश जावडेकर यांनी पेन्शन वाढवून कमीत कमी ३००० रु. करण्यासाठी राज्यसभा पिटीशन समितीकडे अर्ज केला होत. त्यांनी महागाईवर आधारित मागणी केली होती.

त्या अर्जातील सर्व मागण्या समितीने स्वीकारल्या होत्या आणि मुख्य मागणी स्वीकारण्यासाठी सरकारकडे शिफारस केली होती. समितीने या योजनेत सुधार करण्यासाठी शिफारस केली होति. पिटीशन समितीचा अहवाल संसदेच्या पावसाळी सत्रात सदर करण्यात आले होते. हा सर्वसंमत अहवाल स्वीकारण्याऐवजी सरकार कामगार मंत्रालयाच्या जुन्या शिफारशी बाबत विचार करीत आहे.

५ करोड पेक्षा अधिक कामगार-कर्मचारी वर्गाच्या प्रोव्हिडत फंडा खाली एम्प्लोयी पेन्शन योजनेसाठी त्यांच्या वेतनातून ८.३३ टक्के रक्कम कापली जाते. सरकार पेन्शन योजनेसाठी मात्र १. १६ टक्के रक्कम देते. सरकारची अपूर्ण मदत ४१ लाख पेन्शनरमधुन फक्त ३० लाख पेन्शनरना परिणामकारक आहे, दर महिन्याला १००० रुपयेपेन्शन म्हणून त्यांना मिळतात. तर २० लाखापेक्षा जास्त पेन्शनरना कमीतकमी ५०० रुपये मिळतात. सरकार आता हा वाटा १. १६ टक्क्याहून १.१७ टक्के करण्याच्या विचारात आहे. सरकारने पण तो हिस्सा ८. ३३ टक्के करावा अशी मागणी भाजपा करीत आहे.

युपिए सरकार कामगार विरोधी सरकार साबित झाली आहे. करार पद्धतीनुसार कामगारांचे शोषण आणि मजुर विरोधी प्रथा चालू आहे. भाजप मजूर वर्गासाठी समाज सुरक्षा स्वरूपात कामकाज वेतनाचा नवा करारस्वीकारण्यास प्रतिबद्ध आहे.

अरुण कुमार जैन
कार्यालय मंत्री